RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १०, अंक ६२] शुक्रवार, सप्टेंबर २७, २०२४/आश्विन ५, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**अंतिम नगररचना परियोजना नैना क्र. ६,**

**[ चिखले (भाग), मोहो (भाग), पाली खुर्द (भाग), शिवकर (भाग), ता. पनवेल, जिल्हा रायगड यांचे कार्यालय ]**

**जाहीर सूचना**

क्र. लवाद/नरयो-६/अंतिम निवाडा/२०२४/५४९

[(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ७२(७) सहित
महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) अन्वये ]

ज्याअर्थी, प्रारुप नगररचना परियोजना नैना क्र. ६, [चिखले (भाग), मोहो (भाग), पाली खुर्द (भाग), शिवकर (भाग), ता. पनवेल, जिल्हा रायगड], ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र. १०३/१७/नवि-१३, दिनांक १३/०९/२०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असा उल्लेख करण्यात आलेला आहे) च्या कलम ६८ च्या पोट-कलम (२) अन्वये त्यांची अधिसूचना क्र.सिडको/नैना/टीपीएस-६/प्रा.यो./२०२२/५६५ दिनांक २१/१०/२०२२ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्रात** असाधारण भाग-२ मधील पृष्ठ क्र १ ते ६ वर दिनांक ०४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाने श्री. अभिराज गिरकर, निवृत्त सह संचालक, नगररचना यांची नेमणूक उक्त अधिनियमांच्या पोट-कलम (१) कलम ७२ प्रमाणे उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी लवाद म्हणून अधिसूचना क्र.टीपीएस-१२२२/२१५२/प्र. क्र. १४८/२२/नवि-१२, दिनांक २ डिसेंबर, २०२२ अन्वये केली आहे व सदर अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग-१ मध्ये दिनांक २३-२९ मार्च, २०२३ रोजी प्रसिद्ध केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ (१) अन्वये दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी सूचना प्रसिद्ध करून नगररचना परियोजना नैना क्र. ६, [ चिखले (भाग), मोहो (भाग), पाली खुर्द (भाग), शिवकर (भाग), ता. पनवेल, जिल्हा रायगड ], करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दिनांक ५ एप्रिल, २०२३ पासून सुरु करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी नगररचना परियोजना नैना क्र. ६, [ चिखले ( भाग ), मोहो ( भाग ), पाली खुर्द ( भाग ), शिवकर ( भाग ), ता. पनवेल, जिल्हा रायगड ], हीची उक्त अधिनियमांच्या पोट-कलम ( ३ ) कलम ७२ नुसार दिनांक २९ ऑगस्ट, २०२३ रोजीचे नोटीस क्र. लवाद/नरयो- ६/ सर्वसाधारण/ २०२३/४८८/१ अन्वये प्रारंभिक योजना व अंतिम योजना अशी उप विभागणी करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, लवाद यांनी परियोजनेसंदर्भात आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण करून आणि उक्त परियोजना अंतिम करून, उक्त परियोजना नैना क्र ०६ [ चिखले ( भाग ), मोहो ( भाग ), पाली खुर्द ( भाग ), शिवकर ( भाग ), ता. पनवेल, जिल्हा रायगड ], उक्त अधिनियमाच्या कलम ७२( ५ ) मधील तरतुदींनुसार शासनास मंजुरीसाठी सादर केली होती ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ८६( १ ) अनुसार, अधिसूचना क्र टीपीएस/१२२४/०५/प्र. क्र. २२/२४/ नवि -१२ दिनांक १ मार्च २०२४ अन्वये प्राथमिक नगररचना परियोजना क्र. ०६ [ ( चिखले ( भाग ), मोहो ( भाग ), पाली खुर्द ( भाग ), शिवकर ( भाग ), ता. पनवेल, जिल्हा रायगड ], ही अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. १, २, आणि ३ मध्ये नमूद केल्यानुसार काही बदलांसह मंजूर केलेली आहे. सदर अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली आहे;

आणि ज्याअर्थी उक्त नियमांमधील नियम क्र. १३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम ( ६ ) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत.

त्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार अंतिम नगररचना परियोजना नैना क्र. ६, [ चिखले ( भाग ), मोहो ( भाग ), पाली खुर्द ( भाग ), शिवकर ( भाग ), ता. पनवेल, जिल्हा रायगड ], ता. पनवेल, जिल्हा रायगड, या योजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम ( ७ ) प्रमाणे तसेच उक्त नियामांचा नियम क्र. १३( ९ ) प्रमाणे ही परियोजना दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी तयार करण्यात आली आहे असे जाहीर करीत आहेत.

ही अंतिम परियोजना निम्नस्वाक्षरीकार लवाद यांच्याकडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परीयोजनेत समाविष्ट झालेल्या जमिनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे ठेवण्यात आलेल्या आहेत. ही सूचना सिडकोच्या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध राहील. ( *https://cidco.maharashtra.gov.in* ).

**अभिराज गिरकर,**

लवाद,
नैना नगररचना परियोजना क्र. ६, [ चिखले ( भाग ),
मोहो ( भाग ), पाली खुर्द ( भाग ), शिवकर ( भाग )].

दिनांक २७ सप्टेंबर २०२४,
पत्ता : नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४० ० ६१४.

## FINAL NAINA TOWN PLANNING SCHEME, NO. 6

[Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar (pt)
of Tahsil Panvel, Dist. Raigad]

*PUBLIC NOTICE*

No. ARB/TPS- 6/Final Award/2024/549

[ Under Section 72(7) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966
read with Rule 13(9) of the Maharashtra Town Planning Schemes Rules. 1974 ]

Whereas, the Draft Town Planning Scheme, No. 6 (TPS- 6) [Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar(pt) of Tahsil Panvel, Dist. Raigad], was sanctioned by the Vice Chairman and Managing Director, CIDCO under sub-section (*2*) of section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter, referred to as the 'said Act') *vide* Notification No. CIDCO/ NAINA/ TPS-6/ Draft Scheme/ 2022/ 565 ; dated 21st October 2022, in exercise of the powers delegated to him by the Urban Development Department *vide* its Notification No.TPS-1817/973/CR-103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification was published in *Maharashtra Government Gazette*, Extraordinary; Part-II, dated 4th November 2022 on pages No. 1 to 6 ;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department had appointed Shri Abhiraj Girkar, retired Joint Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme *vide* Notification No. TPS-1222/2152/C.R.148/22/UD-12 Dated 2nd December 2022, which was published in *Maharashtra Government Gazette* Part – I dated 23-29 March 2023 under sub-section (*1*) of Section 72 of the said Act;

And whereas, the Arbitrator, in accordance with Rule No. 13 (1) of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 (hereinafter referred to as the 'said Rules'), has declared under his notice dated 5th April 2023 that, he has commenced the duties as Arbitrator in respect of the NAINA Town Planning Scheme, No. 6 [Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar(pt) of Tahsil Panvel, Dist. Raigad], with effect from 5th April 2023;

And whereas, the NAINA Town Planning Scheme, No. 6 [Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar (pt) of Tahsil Panvel, Dist. Raigad], was sub-divided by the Arbitrator under his notice bearing No. ARB/TPS-6/GEN/2023/488/1, dated 29th August 2023 into Preliminary Scheme and Final Scheme as provided under sub-section (*3*) of section 72 of the said Act;

And whereas, the Arbitrator after following the prescribed legal procedure had drawn up the Preliminary NAINA Town Planning Scheme No. 6 [Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar(pt) of Tahsil Panvel, Dist. Raigad], on 29th December 2023 and submitted to the Government for sanction under Section 72(5) of the said Act;

And whereas, the State Government under Section 86(1) of the said Act, *vide* Notification No. TPS/1224/05/CR/22/24/UD-12 dated 1st March 2024 has sanctioned the Preliminary Town Planning Scheme NAINA No 06. [Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar(pt), Taluka Panvel, Dist. Raigad] with some changes as described in Schedules I, II and III of the Notification. The said Notification was published in *Maharashtra Government Gazette* dated 26th September 2024.

And whereas, the Arbitrator has followed the procedure, prescribed in Rule No. 13 of the said Rules, and has carried out the duties laid down in sub-section (*6*) of section 72 of the said Act;

Now, therefore, the undersigned as Arbitrator hereby declares that the Final NAINA Town Planning Scheme, No. 6 [Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar(pt) of Tahsil Panvel, Dist. Raigad], has been drawn up by him on 27th September 2024 as provided under sub-section (7) of Section 72 of the said Act read with rule 13 (9) of the said Rules.

The Final Scheme so drawn up by the undersigned has been published and copies thereof have been kept open for the inspection of the land owners and of the public during office hours at the office of the Arbitrator and of the Special Planning authority, NAINA, at 7th floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD, Belapur, Navi Mumbai. This shall also be made available on website of CIDCO (*https://cidco.maharashtra.gov.in*).

ABHIJIT GIRKAR,

Arbitrator,
NAINA Town Planning Scheme No. 6.
[ Chikhale (pt), Moho (pt), Pali Khurd (pt), Shivkar(pt)].

Date : 27th September 2024,
Place: NAINA, 7th Floor, Tower No. 10,
CBD-Belapur, 400 614.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.